



RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com

Mob- 9822720784






वर्ष ३ रे अंक : २०२ वा शनिवार दि २७ सप्टेंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये


# आधी चुकांवर पांघरुण घालायला साहेब होते अन् आता अजितदादांनी सभेत काढली काकांची आठवण

**वृत्तसंस्था/ पुणे**

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अजित पवार यांनी आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षाला अधिक बळकटी देण्यासाठी कंबर कसली आहे. यात राष्ट्रवादी परिवार मिलन कार्यक्रम असो किंवा जनसंवाद यामध्ये अजित पवार सामान्य नागरिकांपासून आपल्या पक्षातल्या प्रत्येक नेत्यांना भेटून पक्षाला बळ देत आहेत. अशातच आता पुणे जिल्ह्यात अजित पवार यांच्या पक्षात अनेक तगड्या नेत्यांनी प्रवेश केला आहे. पुण्यातील शिवाजीनगर येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालयात भाजप, राष्ट्रवादी (शप) पक्षाच्या अनेक मान्यवरांनी जाहिर पक्ष प्रवेश केला. यात भाजपचे पश्चिम महाराष्ट्राचे अध्यक्ष जालिंदर कामठे, शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे मुरलीधर निंबाळकर तसंच मारुती किंडरे, स्वाती चिटणीस, काँग्रेसचे रोहन सुरवशे यांच्यासह अनेक महिला व कार्यकर्त्यांनी पक्षात प्रवेश केला. या सर्वांचं अजित पवारांनी स्वागत केलं, या कार्यक्रमाच्या निमित्तानं अजित पवारांनी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना संबोधित केलं. यामध्ये अजित पवारांनी शरद पवारांचा उल्लेख करताच उपस्थितांमध्ये हशा पिकला. अजित पवार म्हणाले, आज वेगवेगळ्या ठिकाणी काम केलेल्या नेत्यांचा प्रवेश झाला हे ठीक आहे. आपण वेगवेगळ्या ठिकाणी काम केलेलं आहे. पण शेवटी आपल्याला एकमेकांमध्ये समरस होऊन काम करणं महत्त्वाचं आहे. आपल्या सर्वांना एकमेकांचे स्वभाव, एकमेकांची मतं माहीत आहेत. त्यामुळे आज अजित पवारांना भेटावं की नाही त्यांचा मूड कसा आहे हे जालिंदर कामठे यांना चांगलं कळतं. पण मागचा अजित पवार आणि आत्ताचा अजित पवार यामध्ये खूप फरक आहे. काळानारूप जसं वय वाढतं तसं आपल्याला बदलावं लागतं, माणसात मॅच्युरिटी येते. पूर्वी आपण काही केलं तर आपल्यावर



पांघरुण घालायला साहेब असायचे. आता आपणच पांघरुण घ्यायचं, असं अजित पवारांनी म्हणताच सभागृहामध्ये एकच हशा पिकला गेल्या काही दिवसांमध्ये अजित पवार यांच्या वक्तव्यावरून अनेक वाद झाल्याचे पाहायला मिळाले. आयपीएस अंजना कृष्णा यांच्या फोन कॉलचा वाद असो किंवा सगळ्याचं सोंग घेता येतं पैशाचं नाही या वक्तव्यावरून झालेला वाद असो. या सगळ्या वादांमध्ये अजित पवार यांना स्पष्टीकरण द्यावं लागलं होतं. त्यामुळे आता आपल्या चुकांवर आपल्यालाच पांघरुण घालावं लागतं. आधी चुकांवर पांघरून घालायला साहेब होते, असं मिश्किलपणे म्हणत अजित पवारांनी शरद पवारांची आठवण काढली. अजित पवारांच्या या वक्तव्याची आता जोरदार चर्चा सुरू झाली आहे. मी त्याला सांगितलं तू कसा निवडून येतो तेच पाहतो शिरूरमध्ये माझी भावकीच मला सोडून गेली. तो तर बिचारा पालकमंत्रिपदाची स्वप्नं पाहत होता. त्याला वाटलं सगळेच दादाबरोबर गेले. मग आपण इकडे राहिलो की आपलंच सरकार येणार आणि आपण पालकमंत्री होणार. प्रत्येकानं स्वप्न पाहावं, प्रत्येकाचं ध्येय असावं. याबद्दल कोणाचं दुमत असणार नाही. पण नंतर मी त्याला सांगितलं, तू मला सोडून गेला आता मी तुला पाडणार तू कसा निवडून येतो ते मी पाहणार. असं म्हणत अजित पवार यांनी शिरूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार अशोक पवार यांना टोला लगावला आहे.

# हा पुष्पा कोण? ४०० झाडे उखडून फेकली!

**जनसंचलन/ धामणगाव बडे**

झाडे लावा, झाडे जगवा हा शासनाचा नारा आहे. पुष्पा चित्रपटात चंदन तस्करी दाखविण्यात आली आहे. परंतु मोताळा तालुक्यातील सारोळा मारोती येथील इ क्लास जमिनीवरील जवळपास ४०० काशीद व इतर प्रजातीची एकूण ९० हजारांची झाडे उखडून फेकल्याची घटना समोर आल्याने हा पुष्पा कोण? असा प्रश्न पडला आहे. मोताळा तालुक्यातील सारोळा मारोती येथे कार्यरत ग्राम पंचायत अधिकारी विलास मुकींदा शिवदे यांनी इ क्लास जमिनीवरील जवळपास



३०० ते ४०० काशीद व इतर प्रजातीची झाडे अज्ञाताने उखडून फेकल्या संदर्भात धामणगाव बढे पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.ग्राम पंचायतीच्या वतीने महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत २०१९ मध्ये गट क्रमांक १४९ मध्ये ५ एकर गायरान इ क्लास जमीनीत ३०० ते ४०० काशीद व इतर काही झाडे लावण्यात आली होती. ही गायरान जमीन राखुन ठेवण्यात आलेली आहे. सदर जमीनीची देखभाल ग्राम पंचायत अंतर्गत केली जाते. सदर गायरान हे गुरांना चरण्या करीता राखून ठेवण्यात आली आहे. लावण्यात आलेली सर्वच झाडे हे चांगल्या स्थितीत होती. दरम्यान ही झाडे उखडून फेकल्याचे दिसताच मधुकर श्रीराम व्यवहारे यांनी फोन करुन उपसरपंच प्रदीप सुधाकर कुहाडे यांना याबाबत माहीती दिली. गायरान मधील काशीद व इतर झाडे हे पश्चिम बाजुस कोणतीतरी अज्ञात व्यक्तीने जमीनी पासुन उखडून फेकले आहे. या झाडांची एकुण ९० हजार रुपये ऐवढी किंमत आहे. या प्रकरणी अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पोलिस तपास सुरु आहे.

# एकल महिलांसाठी धोरण गरजेचे

## संपादकीय लेख

अनेक राज्यांत मतांचे भरघोस पीक काढून देणाऱ्या ङ्गलाडकी बहीणफ योजनेचा आदर्श घेऊन बिहारमधील सत्तारूढ नितीशकुमार-भारतीय जनता पक्षाच्या सरकारने विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महिलांच्या खात्यांमध्ये दहा हजार रुपयांची ओवाळणी घातली आहे. भाजप, काँग्रेस यांसह बहुतेक सत्तारूढ पक्षांकडून त्या-त्या राज्यांत अशा प्रकारच्या योजना राबविल्या जात असल्याने ही काही नवीन बाब नाही; परंतु या योजनेची रक्कम देताना महाराष्ट्र, मध्य प्रदेश या राज्यांची लाभार्थ्यांना दरमहा २१०० रुपये देताना दमछाक होत आहे; निवडणुकीच्या आधी दिलेल्या गॅरंटी योजनांमुळे कर्नाटकची आर्थिक परिस्थिती नाजूक झाली आहे. या पार्श्वभूमीवर मागास असलेल्या बिहारमध्ये अन्य राज्यांपेक्षा अधिक म्हणजे दहा हजार रुपये देण्याची योजना देणे म्हणजे अनर्थकारणाला आमंत्रणच म्हणायला हवे; परंतु अशा योजनांशिवाय निवडणूक जिंकताच येणार नसल्याची खात्री राजकीय पक्षांना झालेली दिसते. पंतप्रधान नरेंद्र मोदी पूर्वी अशा लाभांच्या योजनांना ङ्ग रेवडी म संबोधत; परंतु बिहारमधील योजनेचे उद्घाटन त्यांच्याच हस्ते झाले. हा विरोधाभास असला, तरी तो मध्य प्रदेश, महाराष्ट्र येथे आधीच दिसून आला आहे. बिहारमधील या योजनेच्या पहिल्या टप्प्यात ७५ लाख महिलांच्या खात्यांमध्ये रक्कम जमा होणार असून, राज्यातील एक कोटींहून अधिक महिलांना ही रक्कम मिळेल. इतकेच नव्हे, तर सहा महिन्यांत त्यांना दोन लाख रुपयांची घसघशीत भेट देण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात या योजनेसाठी सरकारी तिजोरीतून साडेसात हजार कोटी रुपये खर्च होत असून, भविष्यातील आश्वासनपूर्तीसाठी आवश्यक रकमांचे आकडे नागरिकांचे डोळे पांढरे करणारे ठरावेत. तुमची ती रेवडी आणि आमची ती कल्याणकारी योजना,फ असे कथन उभे करण्यासाठी मतदारांच्या क्षणभंगुर स्मरणशक्तीवर सत्ताधाऱ्यांचा प्रबळ विश्वास असावा लागतो. बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार हे लोकानुनयी योजनांसाठी प्रसिद्ध नसून, नेटाने प्रशासन चालवणारे राजकारणी, अशी त्यांची ख्याती; परंतु दोन दशकांमधील प्रस्थापितविरोधी भावना, अनेक पक्षांशी खो खो खेळण्यामुळे झालेली ङ्गपलटूरामम अशी प्रतिमा, प्रशासनावरील पकड सुटल्याने मोडकळीला आलेली शासनव्यवस्था, बेरोजगारीसारख्या संकटांनी हैराण झालेला युवक वर्ग आणि विरोधकांकडून होणारे चौफ `र हल्ले, यांमुळे तेही त्रस्त झाले आहेत. त्यातच लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मतदारयादीची सखोल पडताळणी आणि ङ्गमतचोरीफ च्या मुद्द्यांवर काढलेल्या ङ्ग मत अधिकार यात्रेफला मोठा प्रतिसाद मिळाला; तसेच राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव यांनीही बेरोजगारीसारख्या विषयांवर रान पेटविले आहे. वेगवेगळ्या संस्थांच्या निवडणूकपूर्व चाचण्या बिहारमध्ये तुल्यबळ लढतीचे भाकित वर्तवत आहेत. अशा स्थितीत हाताशी असलेल्या सर्व शस्त्रांनिशी लढतीत उतरलेले नितीशकुमार आणि भाजपला निवडणूक जिंकण्यासाठी अशा योजनेचा आधार घेणे गरजेचे वाटले असणार. बिहारच्या साडेसात कोटी मतदारांमध्ये साडेतीन कोटी, म्हणजे ४६ टक्के महिला आहेत. त्यापैकी एक कोटी ११ लाख महिलांनी या ङ्गमुख्यमंत्री महिला रोजगार योजनेफसाठी अर्ज केले आहेत. या महिलांच्या मतांवर डोळा ठेवूनच हे लाभ देण्यात येत आहेत, हे उघड गुपित आहे. दोन दिवसांपूर्वीच ङ्गकॅगफ ने राज्यांच्या आर्थिक



स्थितीचा अहवाल प्रकाशित केला. त्यामध्ये कर्ज काढणाऱ्या राज्यांच्या ङ्गटॉप टेनफ मधील बिहारच्या डोक्यावर अडीच लाख कोटी रुपये, म्हणजे एकूण उत्पन्नाच्या ३६ टक्के इतके कर्ज आहे. पगार, पेन्शन आणि कर्जफेडीसाठी ७० हजार कोटी रुपये खर्च होत असून, त्यात नव्या योजनेच्या खर्चाची भर पडली असताना विकासकामांसाठी पैसा कोठून येणार, याचे उत्तर देण्यास कोणालाच सवड नाही. कारण दुसरीकडे काँग्रेस-राजदनेही अशाच वेगळ्या नावाच्या योजनेचे आश्वासन दिलेच आहे. महाराष्ट्रात लाडकी बहीण योजनेवर ४५ हजार कोटी रुपये मोजताना राज्य सरकारला घाम फुटला आहे. कर्नाटकात पाच गॅरंटी योजनांसाठी निधी उपलब्ध करताना तेथील सिद्धरामय्या सरकारलाही असाच घाम फुटला आहे. पूरग्रस्त शेतकऱ्यांना कर्जमाफीची मागणी झाल्यानंतर महाराष्ट्राचे अर्थमंत्री अजित पवार यांनी, पैशांचे सोंग आणता येत नसल्याचा त्रागा केला. असे असतानाही मतांच्या भरघोस पिकांची हमी असल्याने बिहारचे सत्ताधारी हेच पैशांचे सोंग आणू पाहत आहेत. ही योजना ङ्गमतचोरीफच्या आरोपांवर मात करणार का, हे पहावे लागेल.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# नवा व्यवसाय, केंद्राची मदत



कोरोना व्हायसरमुळे देशात लॉकडाऊन करण्यात आल्याने अर्थव्यवस्था पुरती ‘दावली आहे. कोरोनाशी लढतात अर्थव्यवस्थेला चालना द्यावी लागेल, असे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आपल्या भाषणात म्हटले होते. कोरोनाच्या संकटाला संधी म्हणून पाहायचे आहे. आतनिर्भर भारत या अभियानामुळे देशभरात नवीन ऊर्जा निर्माण झाली आहे. यासाठी त्यांनी २० लाख कोटी रुपयांचे विशेष आर्थिक पॅकेज जाहीर केले.

विशेष आर्थिक पॅकेजमध्ये ङ्गआतनिर्भर भारतफ योजना जाहीर करण्यात आली. ही योजना पाच खांबावर उभारली जाईल, असे म्हटले गेले. यातील पहिला खांब अर्थव्यवस्था, दुसरा खांब इन्फ्रास्ट्रचर, तिसरा खांब आपली व्यवस्था तीही तंत्रज्ञानावर आधारित, चौथा खांब लोकसंख्याशास्त्र आणि पाचवा खांब मागणी, चडचए क्षेत्राला कोणत्याही गॅरंटीशिवाय ३ लाख कोटी रु.चे कर्ज उपलब्ध होईल. समाजातील अनेक घटकांशी संवाद साधून हे आर्थिक पॅकेज तयार करण्यात आले आहे. या पॅकेजद्वारे देशातील विकास वाढवण्याची योजना आहे. त्यामुळे ङ्गआतनिर्भर भारतफ योजना म्हटले आहे.यामध्ये सूक्ष, लघू आणि मध्य उद्योगांच्या व्याख्येत बदल करून त्यांच्या गुंतवणूक व वार्षिक उलाढालीची र्यादा वाढविण्यात आली आहे. या व्याख्येनुसार सूक्ष उद्योग १ कोटी रुपयांची गुंतवणूक व ५ कोटी रु.ची वार्षिक उलाढाल, लघू उद्योग १० कोटी रु. गुंतवणूक आणि ५० कोटी रु. उलाढाल, तर ध्य २० कोटी रु. गुंतवणूक, १०० कोटी रु.ची उलाढाल अशी व्याख्या करण्यात आली आहे. तसेच ५० हजार कोटी रुपयांचा एक विशेष निधीही जाहीर करण्यात आला आहे. याचा फ़ायदा त्या उद्योगांना होईल. जे चांगली कामगिरी करत आहेत, पण निधीअभावी त्यांना अडचणी येत आहेत, अशा उद्योगासाठी हा निधी वापरला जाईल.

सरकार यात १० हजार कोटी रु.ची गुंतवणूक करणार आहे. याशिवाय एमएसएमई क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारतफ्रे केल्या जाणाऱ्या २०० कोटी रुपयांपर्यंतच्या खरेदीसाठी ग्लोबल टेंडर न काढण्याची घोषणा करण्यात आली. लघू आणि कुटिर उद्योगांसाठी सहा ोठ्या योजना, लघू आणि कुटिर उद्योगांसाठी कोणत्याही गॅरंटीशिवाय ३ लाख रुपयांचे कर्ज देण्यात येणार, ४५ लाख लघू उद्योगांना ३१ ऑक्टोबरपासून याचा फ़ायदा मिळणार, अशा प्रकारे ही माहिती देण्यात आली आहे. अशा प्रकारे ही आतनिर्भर भारत योजना केंद्राने जाहीर केली आहे.

सर्व व्यवसायामध्ये ई-प्रणालीचा वापर करावा लागेल. आपला व्यवसाय व्होकल ते लोकल आणि लोकल ते ग्लोबल होण्यासाठीचा हा कसोटीचा काळ असेल. र्केटध्ये तुमचा ाल खरेदी करण्यासाठी ग्राहकाच्या हातीही पैसा असणे आवश्यक असेल. आतनिर्भर योजनेतून नवीन उद्योग सुरू होतील. बेरोजगार व्यक्तींना काम मिळेल, पण कोणत्याही व्यवसायाचे साधे गणित आहे की, पहिली किमान दोन वर्षं तरी तुम्हाला व्यवसाय नो-प्रॉफिट, नो-लॉस या तत्वावर करावा लागतो.

कोरोनाच्या काळात आत्म निर्भर भारत योजना आणि तरुण उद्योजकांना संधी म्हणून पाहिले, तर नव्याने व्यवसाय सुरू करण्यासाठी ही चांगली संधी आहे. पण कोरोनाच्या काळात भारतातच नव्हे, तर आशिया पॅसेफिक्क देशात तरुण उद्योजकांना अनंत अडचणींचा सामना करावा लागत आहे.

आतनिर्भर भारत अभियानांतर्गत केंद्र सरकार व्यवसाय सुरू करणाऱ्यांना १० लाख रुपयांची मदत देत आहे. या मागील उद्देश आपल्याला आपल्या पायावर उभे करणे हा आहे. कोरोना साथीच्या रोगामुळे देशातील व्यापार क्षेत्राचा वेग मंदावला आहे. या काळात अनेक व्यवसाय रखडले आहेत, तर काहींना आपला व्यवसाय बंद करावा लागला. मात्र, आतनिर्भर भारत अभियानांतर्गत केंद्र सरकार व्यवसाय सुरू करणाऱ्यांना १० लाख रुपयांची मदत देत आहे. याम ागील उद्देश आपल्याला आपल्या पायावर उभे करणे हा आहे. कोरोना काळात बंद पडलेले व्यवसाय सुरू करण्यासाठी केंद्र सरकार पुन्हा लोकांना मदत करत आहे.

केंद्र सरकारच्या योजनेचा लाभ घ्या
आपल्याला स्वतःचा व्यवसाय सुरू करायचा असेल, तर केंद्र सरकार आत्मनिर्भर भारत अभिनायांतर्गत (ऑीरपळीलहरी इहरीरं अलहळूरप) आपल्याला मदत करेल. या अतर्गत आपण नवीन व्यवसाय सुरू करू शकता किंवा आपला जुना व्यवसाय पुन्हा सुरू करू शकता. दोन्ही प्रकारच्या व्यवसायासाठी केंद्र सरकारकडून मदत केली जात आहे.
पंतप्रधानमुद्रा योजनेंतर्गत कर्ज उपलब्ध
केंद्र सरकारने पंतप्रधान मुद्रा योजना सुरू केली आहे. ही योजना अशा लोकांसाठी अधिक फ़ायदेशीर आहे, ज्यांच्याकडे कर्ज घेण्यासाठी बँकेने निश्चित केलेल्या अटी पूर्ण करण्याची क्षमता नसते. या योजनेंतर्गत देशातील कोणताही नागरिक ज्याच्याकडे कुटिर उद्योग किंवा कोणतीही भागीदारी कंपनी असेल तो कर्ज घेऊ शकतो.

तीन टप्प्यांत दिले जाईल कर्ज
पंतप्रधान ुद्रा योजनेंतर्गत तीन टप्प्यांत कर्ज दिले जाते. सरकारने याध्ये शिशू लोन, किशोर लोन आणि तरुण लोन अशी विभागणी केली आहे.

शिशू कर्ज योजना : या अंतर्गत दुकान उघडण्यासाठी ५०,००० रुपयांपर्यंत कर्ज घेतले जाऊ शकते.

किशोर कर्ज योजना : या योजनेंतर्गत ५०,००० रुपयांपासून ते ५ लाखांपर्यंत कर्ज घेतले जाऊ शकते.

तरुण कर्ज योजना : जर तुम्हाला लघू उद्योग स्थापित करायचा असेल, तर तुम्ही ५ लाख रुपयांपासून १० लाख रुपयांपर्यंत कर्ज घेऊ शकता.

कोणाला मिळू शकते कर्ज
पंतप्रधान मुद्रा योजना लघू उद्योजक आणि व्यावसायिकांसाठी आहे. जर तुम्हाला एखादा मोठा व्यवसाय सुरू करायचा असेल, तर त्या अंतर्गत तुम्हाला कर्ज मिळू शकत नाही. या योजनेंतर्गत लघुउद्योग असेंब्लिंग युनिट्स, सर्व्हिस सेक्टर, दुकानदार, फळ / भाजी विक्रेते, ट्रक ऑपरेटर, फूड सर्व्हिस युनिट्स, रिपेअर शॉप्स, मशीन ऑपरेटर, लघू उद्योग, कारागीर आणि फूड प्रोसेसिंग युनिटसाठी कर्ज घेऊ शकता.

कोठे मिळते कर्ज?
पंतप्रधान ुद्रा योजनेंतर्गत सरकारी बँकांकडून कर्ज घेतले जाऊ शकते. ग्रामीण बँकांदेखील यासाठी कर्ज देत आहेत. सहकारी बँकांकडूनही कर्ज उपलब्ध करून देण्यात येत आहे. आरबीआयने अधिकृत केलेल्या २७ बँका या योजनेंतर्गत कर्ज देऊ शकतात. याध्ये खासगी क्षेत्रातील १७ बँका, ३१ ग्रामीण बँका, ४ सहकारी बँका, ३६ म ायक्रो-फ़ायनान्स बँका आणि २५ बिगर-बँकिंग क्षेत्रातील फ़ायनान्स कंपन्या आहेत.

---

# टपटप टपटप टप्प टप्पाटप

अरुंधती, रंगात येऊन गात होती नि मुले टाळ्या वाजवून गात दाद देत होती. वर्गभर आनंद उधाणवारा झाला होता. निरीक्षक वर्गाबाहेर आडोशाला उभे राहून रंगले होते. हेडमास्तर येताच चेहरा गंभीर करून म्हणाले, काय चाललंय काय? हेडमास्तर बावरले. अस्सा गोंधळ घालतात बघा! कितीदा सांगितलं! गाऊ नका! गाऊ नका! पण ऐकायचं म्हणून नाव नाही. अहो, हेडमास्तर हे फार छान चाललंय. मी प्रसन्न आहे. निरीक्षक म्हणाले. हेडमास्तर गडबडले. असं का? मला आपलं वाटलं! कीः: काय? मी रागावलो? हो. हेडमास्तर धीर करून बोलले. शिक्षण ही आनंददायी अनुभवांची मालिका व्हावी, असं मला फ़ार वर्षांपासून वाटत आलंय. ते आज पूर्ण झालं. असं का? वा वा! चला आपण अरुंधतीचं कौतुक करूया. कोण? त्या टीचर? अरुंधती? फार छान! गाणी सुरेख म्हणते. आवाजात धुरता आहे. हेडमास्तर शब्द जुळवीत कौतुकले. दुकल वर्गात शिरली. हेडमास्तर नि निरीक्षक. अरू गोंधळली. सॉरी सर. पुन्हा नाई गाणार. हेडमास्तरांना म्हणाली. अहो, अरूबाई गा: गा: गा तुम्ही. निरीक्षकांना आवडले, म्हणजे अरू ङ्गविशेषफ शिक्षकच झाली. हेडम ास्तर मनात म्हणाले. काय चाललंय! वर्ग स्तब्ध झाला. समजदार! झाला. नस्ते, मोठे सर वर्ग अभिवादन करीत म्हणालाः. नमस्ते. अरुंधती ॅ, तुमचा आवाज पद्मश्री दर्जाचा आहे. थँक्यू सर. अरू ोठ्या न्रपणे म्हणाली. बाई गाण्याच्या कोविद आहेत, ोठे सर. बाई खूप छान गातात! स्तुतिसुमनांचा वर्षाव होऊ लागला. बरं हेडमास्तर गर झाले. वर्ग चिडीचूप! अहो, रागवू नका हेडमास्तर, दॅट डज हाऊ टीचिंग शुड बी! टाळ्या! मॉनिटरने आज्ञा केली. टाळ्या! कोरसचा गज्जर झाला. ही कविता कशी वाटली? जन्मात नाही विसरणार! पाऊस पडला मनभर. एक बोलकी प्रतिक्रिया आली. निरीक्षक, पण खूश आहेत अरूबाईवर. निरीक्षक मोकळेपणाने म्हणाले.

हेडास्तर उजळपणे म्हणालेः, माझंही अगदी तेच मत आहे. गा बघू. अरॅम नी शिकवलेलं गाणं! देश हा देव असे माझा! मॉनिटरने सुरुवात केली. वर्गाने सुरेल साथ दिली. निरीक्षक खूश! ९वीच्या मुलांनो, अरूबाई ब्राव्हो!

क्लास कंट्रोलचा जरा प्रॉब्लेम आहे. हेडास्तर मिठाचा खडा टाकीत म्हणाले. सर्वात मोठा कोण? देश, भारत. जोरात कोरस. क्लास कंट्रोल इज अ प्रॉब्ले.

हेडास्तर म्हणाले, जवळजवळ कुरकुरलेच! पण निरीक्षकांनी त्याकडे बिलकूल लक्ष दिले नाही. अरुंधतीला शाळेच्या बुकात ङ्गउत्कृष्टफ असा विशेष शेराही दिला. ङ्गदेशभक्त र्निाण करणारी शिक्षिका!फ कौतुक झाले. लेखी शेरा. आता अरूला कसे काढणार? इंटरनॅशनलचे ध्येय होतेः मुले ङ्गग्लोबलफ करणे. पालकांचा जोर वाढला होता. त्यांना आपली मुले यू. एस. ला पाठवायची होती. अरूला ङ्गगावठीफ म्हणून काढा! असाही रेटा होता.

हेडमास्तर मनाशी म्हणाले, ङ्गनिरीक्षक जाऊ देत.फः ङ्गमग आपलेच राज्य.फ पण, अरूचे शोधनिबंध लक लागून किंवा कस लागून पेपरात गाजले, वाजले. जे देशासाठी करता येईल, ते ते करा. परदेशात शिका; पण ती कला भारतात आणून, भारताचे ङ्गनावफ मोठे करा.फ़ साक्षात पंतप्रधानांकडून शाबासकी. वा! वाहवा! तोंड दाबून ुक्क्यांचा मार. राज्यपुरस्कार चक्कः! क्या कमाल! है ना? अरुंधतीचा सरकारी पुरस्कार भरपूर गाजला,

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सोहळ्यात मी नाहले




आमच्या घराशेजारच्यांनी मला बोलावल्याचा निरोप आला. म्हणून मी गेले त्यांच्या वरच्या हॉलमध्ये मला त्या घेऊन गेल्या आणि मला काही बोलताच येईना, तुम्ही जरा जाऊन हॉल उघडा, मी सामान घेऊन येते म्हटल्याने मी कडी काढली आणि थक्कच झाले.


माझा मुलगा सून, नातू, भावंडे असे सगळे जवळचे नातलग आत होते. हॉल पूर्ण सजवला होता. समोरच्याच भिंतीवर माझ नाव आणि फुलांनी ६१चा अंक तयार केला होता. सारं मला सुखद धक्का देणार आणि सर्वांच्या चेह-यावरचा आनंद सारं काही मला मी स्वप्नात नाहीना, असं विचार करायला लावणारं होतं. मी खरंच खूप भारावून गेले. सवकष आनंदाचा हा माझ्या आयुष्यातील पहिलाच भारावलेला प्रसंग.

मी प्रवेश करताच सर्वांनी टाळ्या वाजवल्या आपली आश्चर्याचा धक्का देण्याची कल्पना पार पडली. याचा आनंद माझ्या माणसांना झालेला तर सर्व जाणिवा गोठून गेलेली मी. मी आले तोवर माझ्या पाठोपाठ सर्वांमध्ये सामील असूनही घरातून मी येईपर्यंत निर्विकार राहिलेले माझे पती आले. सर्वांनी माझं औक्षण केलं सारे काही आनंदाचे सोहळे पार पडले.

माझा साठ वर्षांचा जीवनप्रवास हे सर्व आज आठवताना क्षणक्षण आठवतो आहे. एका खेडेगावात माझा जन्म अत्यंत गरीब घरात झाला. माझ्या आत्याला मूल नव्हतं. ती मला मी खूप बाळ असताना घेऊन गेली. मला तीच माझी आई माहीत झालेली. त्यामुळे ती माझी आई अशीच बाकीची नाती होत गेली. मी माध्यमिक शाळेत जाण्याच्या सुमारास माझी आई गेली. तोपर्यंत मला एक भाऊ झाला होता, तो खूप लहान होता. वडिलांची अत्यंत दुर्गम ठिकाणी शिक्षकाची नोकरी होती, त्याठिकाणी ते आम्हाला दोघांना घेऊन राहू शकत नव्हते आणि आम्ही दोघांनी राहण्याचा तो काळ आणि तशी परिस्थिती नसल्याने आम्हाला एका मावशीकडे रहावं लागलं. मी एसएससीची परीक्षा दिली आणि माझं लग्न झालं. मी मोठ्या शहरात राहायला आले. शहर मोठं आणि ज्या घरात आले तेही कुटुंब मोठं, त्यामुळे ठिकाण आणि घर तेथील माणसं सा-यांनीच मी भांबावले होते. परिस्थितीने आणि आलेल्या प्रसंगातून मी तोंड बंद ठेवून कसं राहायचं शिकले होते. पडेल किंवा कोणी सांगेल ते मी काम करत राहिले. व्यवहार, चाली-रीती सर्व काही शिकण्याचं आणि घरातील माणसांची मर्जी सांभाळणे हा माझा अभ्यासक्रम खूप वर्ष राहिला. मला आता कधी मागे वळून आयुष्याकडे पाहताना आणि आत्ताच्या मुलामुलींचे संसार पाहताना मनात येतं, माझं लग्न लवकर झालं आणि मला माझी अशी स्वत:ची मतं काहीच पुसटशीसुद्धा नसल्याने, मी त्या-त्या वेळी कोणी सांगेल ते शिकत गेल्याने आयुष्य शिकले. घरकामाबरोबर उरलेल्या वेळात काम म्हणून आणि संसाराला हातभार म्हणून मी भरतकाम करून देण्याचा पर्याय निवडला आणि कामाला लागले. पोस्टाची आरडी जमा करण्याचं काम स्वीकारलं. माझ्यासाठी मी दुचाकी शिकून घेतली. या सगळ्यासाठी मला माझ्या पतीने मोलाची साथ दिली आणि त्यामुळेच मला माझं जीवन घडवता आलं. नाहीतर मी शिक्षण, आर्थिक, सामाजिक सर्वच बाबतीत मागास होते. माझ्या लग्नानंतर मी माझ्या भावाला, वडिलांना माझ्या नवीन कुटुंबात सामावून घेऊ शकले. माझ्या सर्व एकत्रित असलेल्या कुटुंबाची मी कायम मनातून ऋणी राहिले. जे काम करायचं ते मनापासून, श्रमाने आणि निरपेक्षपणे या भावनांचं माझ्या आयुष्यात भांडवल खूपच फायदेशीर राहील. मला दोन मुलगे झाले. आता मी स्वतंत्र संसार सुरू केला. आत्तापर्यंत आमचं म्हणून एक घरकुल तयार झालं होतं. मुलगेही छान शिकले आणि आर्थिकदृष्ट्या रांगेला लागले. मोठा मुलगा परदेशी गेला आता तो सहकुटुंब तेथे राहतो. त्याने घरात मात्र संपर्क अजिबात कमी केला नाही. दोनही सुना माझ्या मुली म्हणून राहतात. माझ्या मोठ्या सुनेला अत्यंत गरज असल्याने, काही कारणांनी मला ऑस्ट्रेलियाला एकटीने जावं लागलं आणि मनात भीती ठेवून का असेना, तिची गरज म्हणून मी तिथे जाऊन पोहोचले सुद्धा. मला आता कधीच एकटेपणा जाणवत नाही, लहानपणापासून मी एकटी असणारी आता माझं कुटुंब माझ्यासकट नऊजणांच झालं आहे. माझ्यासाठी ते नवरसांच परिपूर्ण रसात्मक आहे. हे पूर्णत्व मला लाभलं यातच मी खूश आहे. मी शहरात राहिल्याने माझ्या नात्याने संबंधित जे नातेवाईक शिक्षण, नोकरी संदर्भात आले त्यांना या शहरात रुजण्यासाठी आवश्यक ती मदत करण्यासाठी माझ्या पूर्ण कुटुंबाने सहकार्य केलं. त्यामुळे इथे रुजलेल्या नातलगांना माझं घर आधारघर राहील. देवाच्या दयेने आणि घरातील सर्वांच्या परोपकारी स्वभावाने मला कोणालाही आवश्यक ती मदत करता आली. अगदी कोणी माझ्या कोकणातून आरोग्याची दोरी बळकट करण्यासाठी उपचारासाठी हॉस्पिटलला आले असतील, तरीही त्यांच्यासाठी लागणारी सोय करणे हे प्रत्येकाने मुख्यत: माझ्या पतीने त्याची जबाबदारी स्वीकारून ते काम आपलसं केलं.

आज मला आर्थिक स्थिरता तर आली आहेच. माझ्या जन्माने मी कोणीच नसलेल्या आणि सुरुवातीची काही वर्ष खडतर गेलेल्या मला काहीच अपेक्षा आणि काहीच ध्येय न नेमून दिल्याने परमेश्वराने मला जे आज दिलं आहे, मी जी काही आज आहे तो माझा मला स्वर्ग वाटत आहे. आज माझ्या साठ वर्ष पूर्ण होणा-या आयुष्याकडून मला सर्व काही मिळालं आहे. नातं हे जन्मानं काय, यापेक्षा आपल्या जीवनात कसे जगतो, किती प्रेमाने जगतो, तशी नाती तयार होऊन ती आपल्याबरोबर जगतात. आपल्याला आनंद आजच्यासारखा देण्याला झटतात आणि कमकुवत वेळेला आधार द्यायला बरोबर असतात. हे जीवनातलं सत्य जगून पटलं आहे. मी आज माझ्या आयुष्याकडून माझ्या माणसांकडून पूर्ण समाधानी आहे. आज सर्वांनी माझ्या साजरा करत असलेल्या सोहळ्यात मी अक्षरश: न्हाऊन निघाले आहे.

# ऑस्ट्रियामध्ये स्पंज सिटी तयार होत आहे



जगभरातील शहरांनी हवामान बदलाचे धोके ओळखले आहेत आणि त्यांचा सामना करण्यासाठी उपाययोजनांवर काम करत आहेत. कारण बहुतांश शहरे हवामानाचा प्रकोप सहन करण्यासाठी तयार केलेली नाहीत. कॉंक्रीटपासून बनवलेल्या इमारती केवळ उष्णतेची लाट वाढवतात. याशिवाय पावसाचे पाणी जमिनीत मुरत नाही, अशा पद्धतीने या इमारती आणि शहरे बांधण्यात आली आहेत.या चुकीचा परिणाम म्हणून गेल्या काही महिन्यांत युरोपातील काही देशांना विनाशकारी वादळे आणि पुराचा सामना करावा लागला आहे.अशा आपत्ती टाळण्यासाठी ऑस्ट्रियामध्ये असे शहर तयार केले जात आहे, जे महापूआणि हवामानाची तीव्रता सहन करण्यास सक्षम असेल. व्हिएन्नाच्या शेजारी असलेल्या ॲमसीबोजेनमध्ये बनवलेल्या या स्पंज सिटीफ्तील झाडं पाहून वाटतं की ती एखाद्या योद्ध्यासारखी शहरे जमिनीत सतत पाणी वाहत राहण्यासाठी गुरुत्वाकर्षणाच्या शक्तीचा वापर करतील.

जेणेकरून हे पाणी तलावात साठवता येईल.सोप्या भाषेत सांगायचे तर, ही स्पंज शहरे ही नैसर्गिक जलचक्राची प्रतिकृती बनवतील.

ऑस्ट्रेलियाच्या युनिव्हर्सिटी ऑफ ॲडलेड लँडस्केप आर्किटेक्चर ॲंड अर्बन डिझाईन प्रोग्रामचे संचालक स्कॉट हॉकेन याबाबत म्हणतात की, ही संकल्पना पाण्याशी हुशारीने काम करण्याची आहे, जेणेकरून पूर कमी धोकादायक होईल. गेल्या दशकभरात स्पंज सिटीचे अनेक घटक जगभरातील मेट्रो शहरांमध्ये समाविष्ट केले गेले आहेत. चीनने २०१३ मध्ये कोंजियन यांची कल्पना स्वीकारली. तेथे ३० शहरांमध्ये या संकल्पनेची चाचणी करण्यात यश आले आहे. त्यामुळे सन २०३० पर्यंत ८० टक्के शहरी भाग या चौकटीत साचेबद्ध करण्याचे नियोजन आहे. कोपनहेगन येथील वेस्टरब्रोच्या एका उद्यानात पृष्ठभागाच्या खाली तलावांमध्ये मोठ्या प्रमाणावर पावसाचे पाणी साठवले गेले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# गोडाचा गोडवा श्रीखंड



श्रीखंड महाराष्ट्राची स्वीट डिश! महाराष्ट्रामधील खाद्यसंस्कृतीमध्ये श्रीखंड या पदार्थाला जास्त महत्त्व आहे. कोणतेही शुभकार्य असले की, घरामध्ये श्रीखंड-पुरीचा बेत तयार केला जातो. श्रीखंड विविध प्रकारात मिळते, जसे की केसर-पिस्ता श्रीखंड, आम्रखंड, फ्रुट श्रीखंड इ. सोबतीला गरमागरम पु-या असल्या तर किती छान!

कुठलेही सणवार हे गोडाधोडाशिवाय अपुरेच. सणांचं आणि गोडाचं नातं खूप घट्ट आहे अन् हे आपण आपल्याच काय इतर संस्कृतींमध्येही बघतो. अगदी प्रत्येक संस्कृतीत त्यांचा त्यांचा एक विशिष्ट गोड पदार्थ हा ठरलेला असतोच. एकूणच काय तर गोडाचा गोडवा हा खास क्षणांसाठी असतो, मग ती जिलेबी असू देत नाहीतर हलवा, खीर असू दे नाहीतर श्रीखंड या सगळ्या पदार्थांची आपलीच एक मज्जा आहे. गोड विषयावर सणावारांना केल्या जाणा-या या पदार्थामागे एक विशिष्ट इतिहास आणि तसेच त्याची वैज्ञानिक कारणही आहेत.

गोडधोड पदार्थाशिवाय नवीन वर्षाच्या उत्साहाची कल्पनाच होऊ शकत नाही. काही सण आणि गोडाचे पदार्थ यांचं नातं अतूट आहे. गुढीपाडव्याच्या सणाशी जोडला गेलेला गोड पदार्थ म्हणजे श्रीखंड. डाएटच्या कल्पनेने दक्ष झालेली मंडळीसुद्धा श्रीखंडाची बोटभर चव चाखल्याशिवाय राहात नाहीत. मग अगदी जातिवंत खवय्यांविषयी काय बोलावे? श्रीखंड-पुरीचा बेत म्हणजे सणाचा आनंद लुटून झाल्यावर दोन-चार तासांच्या निवांतपणाची ग्वाहीच. श्रीखंड हा दुधापासून बनणारा खास मराठी-गुजराती गोड खाद्यपदार्थ आहे. अतिशय साध्या रूपात श्रीखंड म्हणजे चक्का आणि साखरेचे मिश्रण म्हणता येईल. या मिश्रणात अधिक चवीसाठी सामान्यत: बदाम-पिस्ता, काजू, केशर, वेलदोडा, आंब्याचा रस (आमरस) इ. पदार्थ मिसळले जातात. आमरस मिळवला असता या पदार्थास आम्रखंड असे म्हणतात. हा महाभारतकालीन खाद्यपदार्थ असून तेव्हा त्यास शिकरणी या नावाने ओळखले जायचे. जुन्या काळी ८ प्रकारच्या शिकरणी बनत असत, असा उल्लेख सापडतो. असं म्हणतात की, महाभारतात महापराक्रमी भीम जेव्हा विराट राजाकडे बल्लवाचार्य म्हणून काम करत होता, तेव्हा त्याने शिखरिणी नामक पदार्थ बनवल्याचा उल्लेख येतो. त्या शिखरिणीत भीमाने ताजी फळे वापरल्याचा संदर्भ आहे. आजच्या फ्रूट श्रीखंडाचे मूळ थेट भीमापर्यंत मागे गेलेले पाहून गंमत वाटते. दुकानदार मंडळी सीताफळ श्रीखंड, स्ट्रॉबेरी श्रीखंड विकताना अशी जाहिरात करतात की, जणू काही हा नवा प्रयोग त्यांनीच केला असावा. पण यापुढे त्यांना ठामपणे भीमाचा दाखला देता येईल. जुन्याच पदार्थाचं हे नवं रूप चवीला मात्र इतक्या हजारो वर्षानंतरही तितकंच मिट्ट गोड राहिलेलं आहे. अर्थात या श्रीखंडाच्या पाऊलखुणा भीमापर्यंत मागे जात असल्या तरी काही संशोधकांच्या मते, श्रीखंडाची कृती त्या आधी अस्तित्वात आली असावी. गुराखी मंडळी वा कुणीही यात्रेकरू सोबत दही घेऊन प्रवासास निघाले असता, खाली ठेवल्यास दही ओघळेल या भीतीने ते त्यांनी वर टांगले असावे. सकाळी घट्ट झालेला चक्का त्यात गोड काही मिसळून खाल्ल्यावर अधिकच छान लागतो हे त्यांना जाणवले असावे. त्यातून पुढे सामान्य लोकांकडून राजदरबारी स्वयंपाकघरात या साध्याशा पदार्थावर शाही सजावट होऊन श्रीखंड लोकप्रिय झाले असावे, असा अंदाज आहे. आपण या सगळ्या पदार्थाच्या इतिहासाचे ठळक टप्पे शोधू शकतो, पण त्यांच्या निर्मितीमागची प्रेरणा ब-याचवेळा जर तरच्या चक्रातच अडकलेली राहाते. इतिहास तर असेही सांगतो की, श्रीकृष्णने घीवर हे पक्वान्न स्वत: शोधलं.

महाराष्ट्रामधील खाद्यसंस्कृतीमध्ये श्रीखंड या पदार्थाला जास्त महत्त्व आहे. कोणतेही शुभ कार्य असले की, घरामध्ये श्रीखंड-पुरीचा बेत तयार केला जातो. पण हे श्रीखंड आले तरी कुठून याचा शोध घेतल्यास संस्कृत साहित्यामध्ये त्याचे उल्लेख आपल्याला दिसतात. क्षीर आणि खांड या दोन शब्दांपासून या शब्दाची निर्मिती झाली आहे. या शब्दामधील क्षीर म्हणजे दूध तर खांड म्हणजे साखर होय. हा पदार्थ महाराष्ट्रासोबत राजस्थानमध्ये सुद्धा बनवला जातो. श्रीखंडमध्येसुद्धा अनेक प्रकार येतात, त्यामध्ये आम्रखंड याचा समावेश होतो. महाराष्ट्रामध्ये श्रीखंडामध्ये पाणी टाकून पीयूष हा प्रकार सुद्धा केला जातो. श्रीखंड या शब्दाची निर्मिती आणि उगम याविषयी दोन विचार आढळतात. काहींच्या मते प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेल्या शिखरिणी या पदार्थनामाचा अपभ्रंश म्हणजे श्रीखंड. तर काहींच्या मते क्षीर-खंड यापासून श्रीखंड हा शब्द निर्माण झाला असावा. क्षीर अर्थात दूध, त्याचे दही आणि त्यापासून निर्माण श्रीखंड असा हा प्रवास आहे. भारतात एकेकाळी दुधदुभत्याला काहीच कमी नव्हती. त्यामुळे श्रीखंडासारखा पदार्थ सणासुदीच्या निमित्ताने लोकप्रिय झाला यात आश्चर्य नाही. गुजरात, महाराष्ट्र, राजस्थान, पंजाब ही राज्यं श्रीखंडाच्या लोकप्रियतेत वरचा क्रमांक पटकावून आहेत. महाराष्ट्रात तर परप्रांतीय, गोड पदार्थांची ओळख होईस्तोवर सणासुदीला होणा-या गोडाच्या पदार्थात श्रीखंडाचा क्रमांक अव्वल होता.

होळीत पुरणाची पोळी, गणपतीला मोदक अशी गणितं पक्की असली तरी उरलेल्या सणांना श्रीखंडाची निवड अधिकतर होताना दिसायची. फ्रूट श्रीखंडाचा इतिहास महाभारतापर्यंत मागे नेताना आम्रखंड ही मात्र खास महाराष्ट्रीय आणि गुजराती जेवणाची खासियत आहे. आज गुलाबजाम, रसगुल्ला, अंगुरबासुंदी यांच्या समान वाढत्या प्रभावात श्रीखंड हा अनेकातला एक पर्याय होऊन राहिला असला तरी पंचपक्वान्नांच्या पंगतीला श्रीखंडाचा मान आजही तितकाच मोठा आहे. मराठी जेवणाच्या शाही पंगतीचा श्रीखंडपुरी हा आकर्षणबिंदू म्हणता येईल. घरच्याघरी बनवलेले वा आताच्या काळाच्या सोयीने तयार मागवलेले श्रीखंड, तेलात न्हाऊन आलेल्या पुरीच्या सोबतीने मुखात विसावताना आज आनंदी आनंद झालाचा फील आपोआप देते. इतरवेळी पंगतीचे शिष्टाचार काटेकोरपणे पाळणारे आपण बोटाने श्रीखंड उचलून तोंडात चाटवताना कोण काय म्हणेल याच्या पलीकडे आलेले असतो. या श्रीखंडाचा मिट्ट गोडपणा आपल्याला त्या खाद्यतंद्रीकडे अलगद घेऊन येतो. जेवण आटोपल्यावर येणारी सुस्ती, ही तंद्री पुढचे काही तास टिकवून ठेवते. श्रीखंडाचे साफल्य हे आपल्याला या भावावस्थेपर्यंत आणण्यातच आहे.

# संवाद: तुझ्यासोबत आहोत हा विश्वास महिलांना दिला पाहिजे....

## व्यक्तिमत्त्वातील सकारात्मकपणा विकसित करा, मार्ग मिळतो- एसीपी श्वेता खेडकर

जनसंचलन/बुलडाणा

आयुष्यात काही करण्यासाठी त्याग करणे महत्वाचे असते, कुठल्याही प्रकारचे काम करण्याची तयारी व व्यक्तिमत्वातील सकारात्मकपणा प्रेरित केल्यास यशाचा मार्ग हमखास मिळतो असे प्रतिपादन पुणे पोलिस उपायुक्त श्वेता खेळकर यांनी बुलडाणा येथे केले. येथील मानस फाउंडेशनच्या कार्यक्रमात त्यांनी हजेरी लावली. कार्यक्रम शिवसाई युनिव्हर्सल येथे आज २७ सप्टेंबर रोजी सकाळी पार पडला.यावेळी त्यांनी बुलढाणाकरांशी मनमोकळा संवाद साधला. मानस फाउंडेशनच्या वतीने दुर्गा देवी उत्सव निमित्त विविध सामाजिक कार्यक्रम आयोजित केले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मानस फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. डी एस लहाने हे होते. तर माणस फाउंडेशनच्या शहिणा पठाण प्रमुख अतिथी होत्या. शहरातील सामाजिक क्षेत्रात कार्यरत मान्यवर, पत्रकार ,डॉक्टर्स ,मानस फाउंडेशन चे कार्यकर्ते व शिवशाही परिवाराचे विद्यार्थी, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.पुढे बोलताना श्वेता खेळकर म्हणाल्या, बुलढाणा शहराने सकारात्मक अनुभव दिला आहे.या ठिकाणी नोकरीतील आनंदाचा अनुभव घेता आला. राज्यामध्ये अनेक ठिकाणी नोकरी केली. मात्र बुलढाण्याचे लोक सुज्ञ, प्रेमळ असल्याचे श्वेता खेळकर म्हणाले.यावेळेस त्यांनी बुलढाणाकरांनी विचारलेल्या प्रश्नांना मनमोकळेपणे उत्तरे दिली. महिलांच्या प्रश्नावर बोलताना त्या म्हणाल्या, कुटुंबाला आर्थिक स्रोत गरजेचा आहे. यासाठी महिलांना शैक्षणिक प्रवाह मध्ये उतरवले पाहिज.एके काळी पोलीस खात्यात पाचशे पुरुष आणि पाच २५ स्त्रिया असे चित्र होते.हे चित्र बदलत आहे. घरामध्ये नोकरदार महिला असेल तर त्या घराचे चित्र बदलते, मात्र आम्ही तुझ्यासोबत आहोत हा विश्वास आपण त्यांना दिला पाहिजे. नोकरी करताना घरातील जबाबदाऱ्या ह्या देखील त्यांनाच पार पाडाव्या लागतात.ज्या घरात मुली नोकरी करत असतील अशांना कुटुंबातील सदस्यांनी साथ दिली पाहिजे असे त्या म्हणाल्या. आपण आपल्या श्रद्धास्थानाला मूर्ती रुपात पुजत असतो. कोणी कशाची पूजा करावी, कोणाला मानावे हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. मात्र जसे आपण आईला मानतो, जिजाऊ, ताराराणी ह्या जसे आपल्यासाठी प्रेरणा आहे. तसे शक्ती स्थान हे तुम्हाला ऊर्जा देतात.अशा शक्ती स्थानापासून आपण ऊर्जा घेऊन पुढे गेले पाहिजे.समाजात, कुटुंबामध्ये चांगला बदल घडवायचा असेल तर सकारात्मक विचार प्रेरित करावाअसा संदेश त्यांनी यावेळी दिला. व मानस फाउंडेशन ने सुरु केलेल्या कार्याचे कौतुक केले. प्रा. डी एस लहाने यांनी कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट केली. ते म्हणाले मानस फाउंडेशनच्या माध्यमातून एकल महिलांसाठी कार्य करण्याचा वसा आम्ही घेतला आहे. त्याचाच एक भाग म्हणून दुर्गा उत्सवामध्ये विविध सामाजिक व विधवांशी निगडित



कार्यक्रमाचे आयोजन केले असल्याचे लहाने यांनी सांगितले.शिवसाई युनिव्हर्सल च्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांना बोलावून त्यांच्या मुलाखती घेण्याचा उपक्रम सुरू केला आहे. त्याचाच एक भाग म्हणून आज पुण्याच्या पोलीस उपआयुक्त श्वेता खेळकर यांची मुलाखत शिवशाहीच्या विद्यार्थ्यांनी घेतली.यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना दिलखुलास उत्तरे दिली.

# सुट्टीत काय करायचं?



कॉलेजच्या परीक्षा संपल्यावर येणा-या मोठ्या सुट्टीत नेमकं काय करायचं? हा प्रत्येकालाच पडलेला प्रश्न असतो. घरी नुसतं लोळत पडण्यापेक्षा किंवा मित्र-मैत्रिणींसोबत चकाट्या पिटण्यापेक्षा स्वत:ला उपयोगी पडेल असं काहीतरी करावं, असं आपल्याला वाटत असतं. पण नेमकं काय करायचं हा विचार संपता संपत नाही, पण तेवढ्यात सुट्टी मात्र संपत येते. तुमच्यावर ही वेळ येऊ नये म्हणून आम्ही तुम्हाला थोडी मदत करणार आहोत.

कॉलेजच्या परीक्षा संपल्यात आणि भलीमोठ्ठी दोन-अडीच महिन्यांची सुट्टी आता समोर ठाकली आहे. वर्षाअखेरच्या या परीक्षेनंतरची ही मोठी सुट्टी म्हणजे आपल्या सर्व ग्रुपसमोरच एक भलामोठ्ठा प्रश्न असतो, नाही का? या सुट्टीत ग्रुपची काही काळापुरती का होईना ताटातूट होणार असते. एवढे दिवस ग्रुपशिवाय राहायचं म्हणजे शिक्षाच जणू.. त्यामुळेच ग्रुपशिवाय ही सुट्टी काढायची कशी ही चिंता सतावत असते.

एकूणच ही उन्हाळ्याची सुट्टी खूप सारे प्रश्न घेऊन येते. पण सर्वात मोठा प्रश्न हाच असतो की, या सुट्टीत करायचं काय? घरी पालक, कुटुंब यांच्याबरोबर वेळ काढू, त्यांच्यासोबत सहलीला जाऊ, पण अखेर किती काळ तुम्ही घरात राहणार? अर्थात वर्षभर अभ्यास करून आता थोडं रिलॅक्स करायचे हे दिवस आहेत म्हणा, ते जरुरी पण आहेच. सुट्टीत टाईमपास इज मस्ट!

आता तुम्ही हवं ते करायला अगदी मोकळे आहात. तेव्हा तुम्हाला हवं ते वाचा, हवं तिथे जा, हवी ती मजा करा, कोणीही अडवणार नाहीये. सुट्टी सुरू झाली की मित्र-मैत्रिणींसोबत टाईमपास काय करायचा हे तर पहिल्यापासूनच ठरलेलं असतं, मग त्यात मूव्ही असतो, पार्टी असते, एखाद्या अम्युझमेंट पार्कला भेट असते, खाऊपिऊगिरी असते, अशी सर्व धम्माल तर योजूनच ठेवलेली असते.

पण थोडं रिलॅक्स झाल्यानंतर आणि ही सर्व मजामस्ती करून झाल्यानंतर पुढे काय? अनेकांचे आई-बाबाही दिवसा घरी नसतात, तेव्हा घरी बसून करणार तरी काय असा मोठ्ठा प्रश्न पडतो. मग अंगावर चालून येतो मोठ्ठा कंटाळा. अखेर झोपा काढून काढून तरी किती काढणार ना? तेव्हा या सुट्टीत आई-बाबा किंवा मोठ्या भावंडांच्या पाठी माझ्यासाठी वेळ काढा असा धोशा लावण्याऐवजी तुम्हीच तुमच्या वेळेचा छानसा उपयोग का नाही करत? नाही तरी कोणीतरी म्हटलेलंच आहे की, शिकण्याचा एकही क्षण फुकट घालवू नका व आपण तर अजून विद्यार्थीच आहोत. मग या वेळेचा चांगला उपयोग करणं हे आपल्याच हाती आहे. नंतरच्या वयातही तुम्हाला हवे असलेले छंद-आवडी हे जोपासता येतात, नवी कौशल्यं शिकता येतात, पण तेव्हा तुमची बाहेरच्या जगात स्वत:च्या पायावर उभं राहण्याची धडपड सुरू असते. त्यावेळी हवी तेवढी एकाग्रता व वेळ आपण हाती घेतलेल्या इतर आवडीच्या कामासाठी देऊ शकत नाही. कदाचित त्यावेळी तुमच्यावर कुटुंबाची किंवा इतर काही जबाबदारी असू शकेल.

म्हणूनच आता कॉलेजच्या या सुट्टीचा एखादं छानसं कौशल्य शिकून घेण्यासाठी किंवा एखाद्या उपक्रमात सहभागी होण्यासाठी वापर करा. मग आता उठा, मनासारखं लोळून झालं असेल, तर आता मेंदू व मनासाठीचा खुराक सुरू करा. त्यासाठी या सुट्टीत सर्वप्रथम एक काम करा, रोजची सर्व वर्तमानपत्रं नजरेखालून घाला. वृत्तपत्रात रोज महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी काही ना काही नवे उपक्रम येतच असतात. इंटरनेटवरची ग्रुप नोटिफिकेशन्स पाहा. मित्र-मैत्रिणींकडे ते या सुट्टीत काय करणार आहेत, त्यांचे काय प्लॅन्स आहेत याची चौकशी करा. याचा एक फायदा असा की, तुम्हालाही तुमच्या आवडत्या फ्रेण्ड्ससोबत एखादी ॲक्टिव्हिटी शिकता येईल. ग्रुपमधील मित्र-मैत्रिणींसोबत सुट्टीत एखादी गोष्ट करायची किंवा शिकायची म्हणजे धम्मालच. तुम्ही समजा फोटोग्राफी शिकणार असाल, तर फोटोग्राफी आवडणा-या एखाद्या फ्रेण्डला तुमच्यासोबत घ्या व दोघांनी मिळून त्याचा आनंद घ्या. फ्रेण्ड्ससोबत असण्याचा मोठा फायदा हा की तुम्ही एखादी गोष्ट शिकत असाल तेव्हा त्याचं मूल्यमापन एकमेकांना करता येईल. म्हणजे शिकताना एखादी गोष्ट समजली नसेल, चुकली असेल तर ती समजावून घेता येईल. शिवाय आपल्या मित्र-मैत्रिणींसोबत काही वेगळं कौशल्य शिकण्याचा आनंद हा औरच असतो.

मात्र ते सोबत नसले तरीही तुम्ही तुमच्या आवडीच्या विषयामध्ये, छंदासाठी काय नवं शिकता येईल याचा शोध घ्या. एखादं अवगत असलेलं कौशल्य अजून विकसित करण्याचा प्रयत्न करा. उदाहरणार्थ तुम्हाला रॉक क्लायबिंग येत असेल, तर प्रत्यक्ष ट्रेकिंगमध्ये त्याचा कसा उपयोग करता येईल हे शिकून घ्या. दोन-अडीच महिने हा मोठा काळ आहे. साधारणत: जूनमध्ये वगैरे कॉलेज सुरू होईल. एवढ्या कालावधीत तुमचा एखादा कोर्स नक्कीच होईल. अभिनय शिबिरात किंवा एखाद्या रॅपलिंग कॅम्पमध्ये तुम्हाला जाता येईल.

अशा कोणत्याही आवडत्या ॲक्टिव्हिटीमध्ये तुम्ही स्वत:ला गुंतवू शकता. हा काळ असतो बाहेरच्या जगात पाऊल टाकण्यापूर्वीचा. म्हणूनच व्यावसायिक जगात जाण्याआधी कॉलेजच्या या सुट्टीचा तुम्हाला उत्तम उपयोग करून घेता येईल. तुमच्या भावी करिअरच्या किंवा नोकरीच्या दृष्टीने त्याचा तुम्हाला फायदाच होईल. उदाहरणार्थ तुम्ही लघुपट निर्मिती क्षेत्रात पुढे जाणार असाल, तर या सुट्टीत एखादा शॉर्ट फिल्म मेकिंगचा कोर्स करा, प्रत्यक्ष एखाद्या लघुपटाच्या किंवा माहितीपटाच्या निर्मिती प्रक्रियेत सामील व्हा, निर्मिती प्रक्रियेचा एखादा वेगळा कोर्सही तुम्हाला करता येईल. अशा कोर्सेसचा तुम्हाला निश्चितच फायदा होईल.

समजा कॉलेजनंतर पुढे लगेच नोकरी करण्याचा विचार असेल, तर त्यादृष्टीने एखादं कौशल्य शिकून घ्या. तुमच्या अभ्यासक्रमाला भविष्यात महत्त्व व वजन मिळवून देणारे काही कोर्स तुम्ही करू शकता. उदाहरणार्थ तुम्ही भाषा क्षेत्रात करिअर करणार असाल, तर भाषेसंबंधी काही अतिरिक्त कोर्स तुम्हाला या सुट्टीत करता येतील. शिवाय एखादी भाषा तुम्हाला अवगत असेल तर ती शालेय विद्यार्थ्यांनाही तुम्ही घरच्या घरी शिकवू शकता.

# पाण्याचा अंदाज आला नाही, गाडी चार वेळा पलटी, आर. टी. देशमुख यांच्या गाडीचा नेमका अपघात कसा घडला?

**लातूर :** दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांचे कट्टर समर्थक आणि भाजपचे माजी आमदार आर. टी. देशमुख यांचं आज अपघाती निधन झालं. अपघात नेमका कसा झाला? याबाबत वाहन चालकाने माहिती दिली आहे. लातूर-सोलापूर महामार्गावर पाणी साचले आणि पाणी उडून काचेवर आले. यामुळे चालकास समोरचे काही दिसले नाही. अचानक ब्रेक लावला. यामुळे गाडी घसरत जाऊन पलटी झाली. गाडीने चार पलट्या खाल्ल्या. रस्त्यावरील पाण्याचा अंदाज न आल्याने हा अपघात घडला, अशी माहिती चालकाने दिली. या अपघातात माजलगावचे माजी आमदार आर. टी. देशमुख यांना गंभीर दुखापत झाली होती. त्यांना पुढील उपचारासाठी लातूरला नेले जात होते. पण या दरम्यानच त्यांची प्राणज्योत मालवली. आर. टी. देशमुख यांना पुढील उपचारासाठी लातूरच्या सह्याद्री हॉस्पिटलमध्ये दाखल केल्यानंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं. बीड जिल्ह्यातील माजलगावचे माजी आमदार आर. टी. देशमुख यांच्या गाडीला लातूर-तुळजापूर रस्त्यावरील बेलकुंड येथे अपघात झाला. या अपघातात माजी आमदार आर. टी. देशमुख यांचा मृत्यू झाला आहे. त्यांना तात्काळ लातूरच्या सह्याद्री हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आल होते. मात्र उपचार सुरू होण्यापूर्वी त्यांचा मृत्यू झाला.राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वरील बेलकुंड उड्डाणपूलावरून जात असताना गाडी स्लिप होऊन सुरक्षा कठडा तोडून चार वेळेस पलटी झाली. त्यात माजी आमदार आर. टी. देशमुख यांचा मृत्यू झाला. या घटनेत गाडीत असलेला वाहनचालक मात्र बचावला आहे. त्याच्या हाताला आणि डोक्याला मार लागला आहे. महामार्गावरील रस्त्यावर पावसाचे पाणी साचलं होतं. वेगात असलेल्या गाडीच्या समोरील काचेवर पावसाचे पाणी आले. त्यामुळे वाहन चालकास अंदाज लागला नाही. वेगात असलेल्या गाडीला ब्रेक लावला. यात गाडी स्लीप झाली. गाडीने चार पलटी खाल्ल्या.या अपघातात वाहन चालकाच्या बाजूला बसलेले



माजी आमदार आर. टी. देशमुख यांना गंभीर दुखापत झाली. यावेळी तात्काळ रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाली. माजी आमदार आर. टी. देशमुख यांना उपचारासाठी लातूरच्या सह्याद्री हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. मात्र दवाखान्यात दाखल करण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला होता.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# नद्यांचे खोलीकरण, गाळ काढण्याचे काम प्राधान्याने करा -पालकमंत्री ना. मकरंद पाटील

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यात अवेळी पाऊस, अतिवृष्टी व पुरामुळे नद्यांची पाणी पातळी वाढून ते पाणी शेत शिवारात जावून शेतीचे नुकसान होत आहे. त्यासाठी गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियानांतर्गत नद्यांतील गाळ काढणे आणि खोलीकरण करण्याचे काम प्राधान्याने करावे. इंधनासाठी निधी दिला जाईल. अतिवृष्टीमुळे ज्या शेतकऱ्यांच्या शेतजमिनी खरडून गेल्या आहेत अशा शेतकऱ्यांना शेतात गाळ टाकण्यासाठी प्रशासनाने प्रोत्साहित करावे, असे निर्देश पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी आज दिले. त्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची बैठक ही जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात झाली. या बैठकीला सहपालकमंत्री ना. संजय सावकारे, आमदार चैनसुख संचेती, आ. संजय गायकवाड, आ. धीरज लिंगाडे, आ.सिद्धार्थ खरात, आ.मनोज कायंदे, जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, पोलीस अधीक्षक नीलेश तांबे, निवासी उपजिल्हाधिकारी सदाशीव शेलार यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत पालकमंत्री ना. मकरंद पाटील आणि सहपालकमंत्री ना. संजय सावकारे यांनी जिल्हा वार्षिक योजनेतील कामांच्या निधी वाटप व खर्च, प्रशासकीय मान्यता, नवीन शाळा व दुरुस्ती, पाऊसपाणी, अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान, नैसर्गिक आपत्ती मदत वाटप, अवकाळी पाऊस, वादळवारा, गारपीट, अतिवृष्टीमुळे बाधित शेतपिकांची माहिती, फळबाग लागवड, प्रधानमंत्री पीक विमा योजना आदी विषयांचा सविस्तर आढावा घेतला. पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी आढावा घेतांना जिल्हा वार्षिक योजनेतील प्रस्तावित कामांच्या प्रशासकीय मान्यता सप्टेंबर अखेरपर्यंत पूर्ण कराव्यात. तशा सूचना शासनाने जारी केल्या आहेत. तसेच आक्टोबर महिन्याअखेर कामांचे कार्यादेश देण्याचे काम पूर्ण करावे, असे निर्देश पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी विभागांना दिल्या. ते पुढे म्हणाले की, जिल्ह्यातील बऱ्याच भागात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांवर संकट आले आहे. त्यांना मदत करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. प्रशासनाने देखील तत्परतेने पंचनामे पूर्ण करावेत. तसेच जून ते ऑगस्ट या कालावधीत झालेल्या अवेळी पाऊस आणि अतिवृष्टीची मदत मंजुर करण्यात आली आहे. या मदतीचे वाटप सुरु झाले आहे. सप्टेंबरमध्ये झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानाचे पंचनामे युद्धपातळीवर करावेत. या आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना शेतपिकांची नुकसान भरपाई दिवाळीच्या अगोदर त्यांच्या थेट बँक खात्यात वितरित करण्याचा प्रयत्न करण्यात येईल, तसेच खरडून गेलेल्या जमिनीची नुकसान भरपाई लवकरच देण्यात येणार असल्याचे पालकमंत्री ना. जाधव यांनी यावेळी सांगितले. यावेळी सहपालकमंत्री ना. संजय सावकारे यांनी जिल्हा



वार्षिक योजनेतील कामांची आढावा घेत प्रशासकीय मान्यता सप्टेंबरपर्यंत प्रदान कराव्यात. कामे सुचवितांना लोकप्रतिनिधींच्या सूचनांचा गांभीर्याने विचार करावा, अशा सूचना त्यांनी दिल्या. या बैठकीनंतर पालकमंत्री ना. मकरंद पाटील आणि सहपालकमंत्री ना. संजय सावकारे यांच्या हस्ते जिवंत सातबारा मोहिमेंतर्गत लाभार्थ्यांना सातबारा प्रमाणपत्र तसेच भुमिहिनांना घरकुलांसाठी जागा वाटपाचे प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. या बैठकीत उपस्थित लोकप्रतिनिधींच्या सूचनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी, समाज कल्याण सहायक आयुक्त आणि प्रकल्प संचालक यांनी सादरीकरण केले.

# पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी अतिवृष्टीग्रस्त भागाची केली पाहणी



जनसंचलन/बुलढाणा

: राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना.मकरंद पाटील यांनी आज तालुक्यातील नळकुंड, मलकापूर तालुक्यातील दाताळा, जांबुळ धाबा येथील शेतकऱ्यांच्या बांधावर जावून पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांना धीर दिला. नैसर्गिक आपत्तीच्या संकटात सापडेल्या शेतकऱ्यांच्या पाठीशी राज्य शासन खंबीरपणे उभे आहे. मागील जून ते ऑगस्ट महिन्यातील अवेळी पाऊस आणि अतिवृष्टीची नुकसान भरपाई वितरित केली जात आहे. सप्टेंबर महिन्यात गेल्या काही दिवसात झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीचे पंचनामे पूर्ण करुन घ्यावे. नदीजकवळील खरडून गेल्या जमिनी व वाहून गेलेल्या शेतीपूरक साहित्य, जनावरे आणि पडझड झालेल्या घरांची नोंद करुन घ्यावी.आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना लवकरात लवकर नुकसान भरपाई देण्याची कार्यवाही करण्यात येईल. शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये, शेतकऱ्यांच्या पाठीशी आम्ही आहोत, असे आश्वस्त करत पालकमंत्री ना. पाटील यांनी शेतकऱ्यांना धीर दिला. यावेळी आमदार चैनसुख संचेती, आमदार संजय गायकवाड, आमदार मनोज कायंदे, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, उपविभागीय अधिकारी संतोष शिंदे, शरद पाटील, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी मनोज ढगे, तहसिलदार, तालुका कृषी अधिकारी, तलाठी आदी अधिकारी व कर्मचारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते

# स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियानाचे हतेडी प्राथमिक आरोग्य केंद्रात शुभारंभ

जनसंचलन/बुलढाणा

स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियानाची सुरुवात हतेडी प्राथमिक आरोग्य केंद्र येथून झाली असून विशेष शिबिराचे उद्घाटन आज उत्साहात पार पडले. यावेळी हतेडी बु. व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष संजय गायकवाड होते. तर हतेडी बु. ग्रामपंचायतीचे सरपंच श्रीकांत जाधव, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. वर्षा गुट्टे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. महेंद्र सरपाते उपस्थित होते. आरोग्य शिबिरामध्ये स्त्रीरोग तज्ञ डॉ. नीलगंधा शिंदे, त्वचारोग तज्ञ डॉ. पाबीलवार, दंतरोग तज्ञ डॉ. शरद काळे, बालरोग तज्ञ डॉ. भरत लहाने या तज्ज्ञ डॉक्टरांनी शिबिरामध्ये ३०० पेक्षा जास्त रुग्णांची तपासणी केली. शिबिराचे यशस्वी आयोजनासाठी डॉ. अरुण जवंजाळ, डॉ. कविता बंगले तसेच संपूर्ण आरोग्य सेवा कर्मचारी वृंद यांनी परिश्रम घेतले.



# ॲड. शर्वरी रविकांत तुपकर थेट शेतकऱ्यांच्या बांधावर..!

## अतिवृष्टीग्रस्तांना दिला धिर,शंभर टक्के नुकसान भरपाई द्या!

जनसंचलन/बुलढाणा

सिंदखेड राजा तालुक्यातील शेतकरी सध्या अतिवृष्टीच्या मोठ्या संकटाला सामोरे जात आहेत. पावसाने शिवार पाण्याखाली गेले असून, शेतकऱ्यांचे पिक वाचवण्याचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले आहेत. या भीषण परिस्थितीत शेतकऱ्यांना धीर देण्यासाठी व त्यांच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी २६ सप्टेंबर रोजी ॲड. शर्वरीताई रविकांत तुपकर यांनी दत्तापूर, धांदरवाडी, भोसा, शेलु, वर्दडी, सोनोशी यासह इतरही गावांना भेट दिली. या भेटीत शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांनी प्रत्यक्षात पाहिले की सोयाबीन व कपाशीचे पीक पाण्यात बुडाले असून, मोठ्या प्रमाणावर सडले आहे. अनेक ठिकाणी पुराच्या पाण्याने बांध फ ुटले आहेत, सुपीक माती वाहून गेली आहे, तर काही ठिकाणी विहिरीही वाहून गेल्या आहेत . शेतकऱ्यांच्या मेहनतीचे शिवार अक्षरशः उद्ध्वस्त झाल्याचे चित्र या पाहणीत स्पष्ट दिसून आले. या वेळी अँड शर्वरीताई तुपकर शेतकऱ्यांशी संवाद साधताना म्हणाल्या ङ्कङ्घया संकटात खचून जाऊ नका. आम्ही तुमच्या सोबत खंबीरपणे उभे आहोत. झालेल्या नुकसानीची सरकारकडून शंभर टक्के भरपाई मिळवून देण्यासाठी आम्ही संघर्ष करू. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आम्ही लढू आणि तुमची व्यथा शासनापर्यंत पोहोचवू.ङ्कङ्घ तुपकर यांनी पुढे सरकारवर टीका करताना म्हटले की, शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रू आणणारे हे संकट असून, शासनाने जाहीर केलेली मदत अतिशय तुटपुंजी आहे. या



मदतीने शेतकऱ्यांचे काहीच भले होणार नाही. शेतकऱ्यांना त्यांच्या झालेल्या नुकसानीची शंभर टक्के भरपाई मिळालीच पाहिजे, अशी त्यांची ठाम व आग्रही मागणी आहे. भेटीदरम्यान गावोगावी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी आपल्या नुकसानीची वेदना व व्यथा अँड शर्वरीताई तुपकर यांच्यासमोर मांडली. काही शेतकऱ्यांनी जमिनी खरडून गेल्यामुळे आगामी रब्बीच्या पेरणीचाही प्रश्न गंभीर बनल्याचे सांगितले. संपूर्ण तालुक्यातील परिस्थिती पाहता शेतकरी खचलेले, हतबल व निराश दिसत होते. मात्र अँड शर्वरीताई तुपकर यांच्या उपस्थितीने व दिलेल्या धीराने शेतकऱ्यांच्या डोळ्यात आशेचा किरण पुन्हा दिसू लागला.

# वादग्रस्त जिल्हा उपनिबंधक डॉ.लोखंडेंची उचलबांगडी!

## लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने केली होती कारवाई! कर्तव्यदक्ष गितेशचंद्र सावळेंनी घेतला प्रभार!

जनसंचलन/ बुलढाणा

कर्तव्यासंदर्भात दक्षपणाचे धडे देणारे येथील गितेशचंद्र सावळे यांची अकोला जिल्हा उपनिबंधक पदी प्रभारी म्हणून बदली झाली आहे. आधी ते बुलढाणा नंतर वाशिम आणि आता अकोला येथे ते सहकारी संस्थेची धुरा सांभाळणार आहेत.याला कारण असे की, कायम वादग्रस्त राहिलेले डॉ. प्रविण लोखंडे यांची अकोला जिल्हा उपनिबंधक पदावरून उचलबांगडी करण्यात आली आहे. अकोला जिल्ह्यातील उमरी येथील डॉ. प्रवीण लोखंडे यांनी जिल्हा उपनिबंधक पदावर कार्यरत असताना अनेक वाद घातले. विशेष म्हणजे अमरावती व अकोला येथील लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने त्यांच्यावर कारवाई केली असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.दरम्यान



महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४ मधील तरतुदी नुसार सहकार विभागातील प्रशासकीय कारणास्तव गितेशचंद्र सावळे यांची बदलीने नियुक्ती आता अकोला येथील सहकारी संस्थेत उपनिबंधक म्हणून झाली आहे.त्यांचे बुलढाणा, वाशिम येथील कार्य कर्तव्य नागरिकांच्या पसंतीसउतरलेहोते.

# अ. भा. मराठी पत्रकार परिषद यावर्षी पासून समाजसेवेसाठी पुरस्कार देणार

जनसंचलन/मुंबई

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने पत्रकारितेत देदीप्यमान कामगिरी करणारया पत्रकारांना विविध पुरस्कार देऊन दरवर्षी सन्मानित केले जाते.. यावर्षी पासून सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात भरीव कामगिरी करणारया व्यक्तींना ङ्कङ्घलोकनेते रामशेठ ठाकूर सामाजिक -शैक्षणिक सेवा गौरवङ्कङ्घ पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.. ५१,१११ रूपये रोख, मानपत्र, स्मृतीचिन्ह, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप असेल.. रामशेठ ठाकूर यांनी परिषदेकडे ठेवलेल्या ठेवीतून हा पुरस्कार दिला जाणार असल्याची घोषणा परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख आणि अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर यांनी एका प्रसिद्धी पत्रकाव्दारे केली आहे ..फेब्रुवारी २०२६ मध्ये यंदाचे पुरस्कार दिले जातील.. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेकडे विविध मान्यवरांनी ठेवलेल्या ठेवीच्या व्याजातून दरवर्षी १० पत्रकारांचा गौरव केला जातो.. यामध्ये परिषद स्वत:च्या निधीतून एका ज्येष्ठ पत्रकाराचा ङ्कङ्घआचार्य बाळशास्त्री जांभेकर जीवनगौरव पुरस्कारङ्कङ्घ देऊन गौरव करीत असते.. २५ हजार रुपये रोख, मानपत्र, स्मृतीचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप असते.. यावर्षी पासून सामाजिक आणि शेक्षणिक क्षेत्रात भरीव कामगिरी करणारया एका मान्यवर व्यक्तीचा ङ्कङ्घलोकनेते रामशेठ ठाकूर सामाजिक सेवा गौरव पुरस्कारङ्कङ्घ देऊन सन्मान केला जाणार आहे.. एक निवड समिती पुरस्कार्थींची निवड करते.. पत्रकारितेच्या क्षेत्रात परिषदेचे पुरस्कार मानाचे समजले जातात.. यापुढे एका समाजसेवकाचा सन्मान परिषदेच्या या पुरस्कारांची उंची वाढवणार आहे.. एस.एम.देशमुख, मिलिंद अष्टीवकर आणि पनवेल प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत शेडगे यांनी नुकतीच पनवेल येथे माजी खासदार रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन यासंदर्भात त्यांच्याशीचर्चाकेली..